बातम्या व
जाहिरातीसाठी
संपर्क साधा
* संपर्क *
मो. 9421505122

साप्ताहिक
# मनमाड थिणगी

https://manmadthinagi.com/news

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल          संपादक : तुषार गोयल

RNI Regd.No.91032/90 (Delhi) | वर्ष ३४ वे | अंक ७ वा. | वार : रविवार दि.१२ मार्च २०२३ | पाने ४ | किमत ५ रू.

22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड
बिनघटीचे दागिने
शुध्दता आणि विश्वास
100%
BIS Approved
Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल ९४२१५०५१२२
दिपक गोयल ९९६०९३१४१४

## नगर परिषद इमारतीसाठी दहा कोटींचा निधी मंजूर आमदार कांदे यांच्या पाठपुराव्याला यश

मनमाड : राज्य शासनातर्फे नगर परिषदांना वैशिष्टपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत मनमाड नगर परिषदेची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी १० कोटी रूपयांचा निधी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने गुरूवारी (दि.९) मंजूर केला आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सध्याची मनमाड नगर परिषदेची इमारत नादुरूस्त असल्याने व अनेक ठिकाणी पडझड झाल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी १० कोटी रूपयांची मागणी आमदार सुहास कांदे यांनी मुख्यमंत्र्याकडे केली होती. ती मुख्यमंत्र्यांनी मान्य करीत गुरूवारी विधानसभेत आपल्या भाषणात मनमाड




नगर परिषदेला वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी १० कोटींचे अनुदान मंजूर करत असल्याची घोषणा केली आहे.

नवीन नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या प्रकल्प खर्चाच्या ९० टक्के हिस्सा हा राज्य शासनाचा व १० टक्के हिस्सा मनमाड नगर परिषदेचा राहणार आहे. कार्यान्वयन यंत्रणाही मनमाड नगर परिषद राहणार आहे. त्यानुसार लवकरच या कामाची ई-निविदा निघणार आहे. सदर काम पूर्ण करण्याची मुदत ३१ मार्च २०२४ राहणार आहे.

या वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेली ९० टक्के म्हणजे ९ कोटी रूपयांची अनुदानाची रक्कम तात्काळ मनमाड नगर परिषदेला कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरित केली जावी, असे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. त्यात नगर परिषदेने १० टक्के म्हणजे, १ कोटी रूपयांचा स्वनिधी भरायचा आहे. या निधीमुळे नगरपरिषदेची अद्ययावत इमारत होणार असल्याने अनेक अडचणी दूर होणार आहेत.

## सहा.पो.नि.पी.बी.गीते यांचा निरोप समारंभ पो.निरीक्षक बाळासाहेब थोरात यांचे स्वागत



मनमाड : मनमाड शहर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांची नाशिक येथे बदली झाल्याने त्यांचा निरोप समारंभ व मनमाड शहर पोलीस स्टेशनचा पदभार पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांनी स्विकारल्याबद्दल त्यांचा स्वागत समारंभ शनिवारी सायंकाळी मनमाड शहर पोलीस स्टेशनमध्ये अधिकारी आणि कर्मचारी वृंद मनमाड शहर पोलीस स्टेशनतर्फे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस उपअधिक्षक समिरसिंग साळवे होते. या निरोप व स्वागत समारंभास मनमाड शहरातील सर्वच राजकीय पक्ष, सामाजिक, व्यापारी, पत्रकार, वकील, डॉक्टर इ. क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

सहा.पोलीस निरीक्षक पी.बी. गिते यांनी गेली दोन वर्ष चार महिने मनमाड शहर पोलीस स्टेशनचा

पान २ वर...

## विकासपुरूष आमदार सुहास कांदे यांच्या स्वखर्चातून नांदगांव तालुक्यातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य सुविधांचा शुभारंभ



नांदगांव : विकासपुरूष आमदार सुहास कांदे व सौ.अंजुमताई कांदे यांच्या स्वखर्चातून नांदगांव मतदार संघातील नागरिकांना मोफत फिरता दवाखाना व मोफत शासकीय कार्यालय या सुविधांचा शुभारंभ नांदगाव तालुक्यातील आमोदे व बोराळे गावात शनि.दि.११ रोजी करण्यात आला.

नागरिकांसाठी सुसज्ज अद्ययावत उपकरणांसह दोन गाड्यांचे युनिट, डॉक्टर, सिस्टर, मदतनीस, डोळ्यांचे डॉक्टर, सेतू कार्यालय प्रतिनिधी व स्टाफ सोबत शनिवार दि.११ रोजी सकाळी ९ वाजता दोन्ही गावात पूजा करत नारळ फोडून या सेवा देण्यास सुरूवात करण्यात आली.

पहिल्याच दिवशी बोराळे येथे मोफत फिरता दवाखाना मार्फत २६४ नागरिकांची डोळ्यांची तपासणी करण्यात येवून ३० नागरिकांना ऑपरेशन करण्याचा सल्ला देण्यात आला. २५० जणांना डोळ्यांचा चष्मा देण्यात आला. तर ओपीडीत ७२ जणांची तपासणी करण्यात येवून औषध-गोळ्या देण्यात आल्या. मोफत शासकीय कार्यालय या सुविधेमार्फत ५५ नागरिकांनी शासकीय दाखले घेण्याचा लाभ घेतला.

आमोदे येथे ३०५ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. यातील ३६ जणांना ऑपरेशनचा सल्ला देण्यात आला तर २३५ जणांना डोळ्यांचा चष्मा देण्यात आला. ओपीडीत १०० जणांची तपासणी करण्यात येवून औषध-गोळ्या देण्यात आल्या. मोफत शासकीय कार्यालय या सुविधेमार्फत ४५ नागरिकांनी शासकीय दाखले घेण्याचा लाभ घेतला.

आमोदे व बोरोळे येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देत या सुविधांचा लाभ घेण्यासाठी मोठी गर्दी केली. नागरिकांना डोळ्यांच्या तपासणी नंतर तात्काळ मोफत चष्मा वाटप करण्यात येत आहे, तसेच

पान २ वर...

## शहरातून मोटरसायकल व महिलेच्या गळ्यातील पोत चोरीस

मनमाड : मनमाड शहर परिसरात मोटरसायकल चोरीच्या घटना सुरू असून शहरातून एक मोटरसायकल पुन्हा चोरी गेली आहे तर एका महिलेच्या गळ्यातील पोत चोरट्यांनी लांबविल्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शहरात मोटरसायकल चोरी इ. चोरीच्या घटना सुरू असतांनाच खंडेराव मंदिरासमोर घराजवळून रॉयल इन्फिल्ड कंपनीची लाल रंगाची ४५ हजार रूपये किंमतीची दुचाकी क्र.एम.एच.१२ आर.बी.७०४५ गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी सुनिल आनंदा सानप यांनी मनमाड पोलीस स्थानकात तक्रार दिली असून पुढील तपास पोलीस करीत आहे.


चोरीच्या दुसऱ्या घटनेत मनमाड-चांदवड रोडवरील दरेगाव नाका येथे एका महिलेच्या गळ्यातून १५ हजार रूपये किंमतीची ५ ग्रॅम वजनाची पोत अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलीस

पान २ वर...

## गॅस सिलिंडर दरवाढ विरोधात शिवसेना ठाकरे गटातर्फे केंद्र व राज्य सरकार विरोधात आंदोलन

मनमाड : घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या किमतीत केंद्र सरकारने भरघोस वाढ करून महिला दिनानिमित्त महिलांना अनोखी भेट दिल्याचा आरोप करीत मनमाड शहर शिवसेना ठाकरे गटातर्फे सिलिंडर आडवे पाडून चुलीवर स्वयंपाक करीत निषेध करण्यात आला. यावेळी केंद्र राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

घरगुती गॅस सिलिंडर १ हजार १०३ रूपये झाल्याने गृहिणीचे बजेट कोलमडले आहे. तर व्यावसायिक गॅस सिलिंडर




साठी २ हजार ११९ मोजावे लागत असल्याने व्यावसायिक त्रस्त झाले आहे. येथील एकात्मता चौकात शिवसेना ठाकरे गटातर्फे चुलीवर स्वयंपाक करण्याचे अनोखे आंदोलन केले. हातात भगवे झेंडे घेऊन शिवसैनिकांनी तर खाली सिलिंडर आडवे करत महिला चूल मांडून त्यावर स्वयंपाक करत केंद्र सरकारचा निषेध केला. दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे

पान २ वर...

# मिञ मंडळ संचालित श्रीराम जन्मोत्सव समिती २०२३ ची मंगळवारी जाहीर बैठक

मनमाड : सालाबादप्रमाणे यंदाही सन १९८६ पासून सलग ३७ वर्षी मित्र संचलित श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने गुरूवार दिनांक ३०।०३।२०२३ रोजी चैत्र शुद्ध नवमी श्रीरामनवमी निमित्ताने श्रीराम मंदिर, आठवडे बाजार येथे श्रीराम जन्मोत्सव आणि भव्य श्रीराम रथयात्रा मिरवणूक चे नियोजन करणे साठी श्रीराम जन्मोत्सव समिती २०२३ ची जाहीर बैठक मंगळवार दिनांक १४।३।२०२३ रोजी सायंकाळी ६:३० वाजता श्रीराम मंदिर आठवडे बाजार येथे जाहिर बैठक आयोजित केली आहे. तरी मनमाड शहर व परिसरातील सर्व हिंदुत्ववादी संघटना, संस्था, पक्ष यांचे पदाधिकारी कार्यकर्ते व श्रीराम भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सनी फसाटे, अध्यक्ष, श्रीराम जन्मोत्सव समिती २०२३ यांनी केले आहे.

# मविप्र शैक्षणिक संकुलात महिला दिन साजरा



मनमाड : मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मनमाड येथे आज महिला दिनाच्या निमित्ताने राज्य कर निरीक्षक श्रीमती वंदना पगार यांचे महिला सशक्तीकरण यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी डी गव्हाणे, अभिनव शाळेचे मुख्याध्यापक श्री वाघ सर, स्थानिक व्यवस्थापन समितीच्या महिला सदस्य श्रीमती दामले, बेग, इ. उपस्थित होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूल च्या प्राचार्या श्रीमती पूनम मढे मॅडम या होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी. डी.गव्हाणे यांनी उपस्थीत मान्यवरांचे स्वागत केले व मतदानाच्या हक्कासाठी सुरू झालेल्या या चळवळीचे रूपांतर जागतिक महिला दिनात झाले. उपस्थित विद्यार्थिनी व महिलांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

राज्य लोकसेवा आयोगाच्या कर निरीक्षक या पदाला गवसणी घालत असताना वंदना पगार यांना काय अनुभव आले याचे कथन त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. याप्रसंगी सर्वच महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. अभिनव शाळेच्या श्रीमती झाल्टे मॅडम, कवडे मॅडम, ज्युनियर कॉलेज च्या कर्डेल मॅडम, भुरुक मॅडम, काकळीज मॅडम, आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलच्या शेलार मॅडम, शेळके मॅडम, धात्रक मॅडम आदी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन श्रीमती आहेर मॅडम यांनी केले तर आभार डॉ.फापाले मॅडम यांनी मांडले.

# मनमाड बाजार समितीतर्फे अजित सुराणा यांचा सत्कार



मनमाड : मनमाड बाजार समिती मधील प्रतिष्ठित कांदा व मका व्यापारी अजित सुराणा यांना चांदवडच्या SNJB संस्थेतील अतुलनीय शैक्षणिक कार्याबद्दल पुणे विद्यापीठाचा जीवन साधना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा मनमाड बाजार समितीच्या सर्व घटकांद्वारे दि.९।३।२३ रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय सांगळे, व्यापारी असोसएशनचे अध्यक्ष रिखबशेठ ललवाणी, व्यापारी बाळू चोपडा, संदीप ललवाणी, प्रकाश बढे, किसनलाल बंब, परेश राका, प्रशांत राका, मनोज पाटणी, सुरेश बोडखे, अन्वर सैय्यद, नाना आहेर यांचेसह बाजार समिती मधील सर्व कांदा, मका व धान्य व्यापारी तसेच बाजार समितीचे सचिव विश्वास राठोड, बाजार समिती मधील अधिकारी नानासाहेब उगले, वसंत घुगे, संजय पवार, कैलास आव्हाड, नितीन दराडे व बाजार समिती मधील शेतकरी, सर्व कर्मचारी, हमाल मापारी व इतर बाजार घटक उपस्थित होते.

# पान १ वरून..पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांचे स्वागत

कारभार सांभाळत असतांना सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी आपल्याला सहकार्य केले असल्याचे मत व्यक्त करीत सर्वांचे आभार मानले. तर नवनियुक्त पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांनी माझ्याकडून मनमाड करांना नेहमी मदत व सहकार्य होईल असे आश्वासन देत मनमाड शहरवासीयांतर्फे सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी शहरातील सर्वपक्षीय नेते, व्यापारी संघटना, पत्रकार, वकील, डॉक्टर यांनी सहा.पो.निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या कार्याकाळातील कामाना उजाळा दिला. मनमाड शहर शिवसेना संपर्क कार्यालयातर्फे सहा.पो. निरीक्षक पी.बी.गीते व पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करण्यात आला.

# पान १ वरून...शहरातून मोटरसायकल व महिलेच्या गळ्यातील पोत चोरीस

स्थानकात माया संतोष पगारे (३६) यांनी तक्रार दिली असून याबाबत पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. मनमाड शहर परिसरात चोरीच्या घटना थांबत नसल्याने चोरांना पकडण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. यामुळे पोलिस आता या चोरांना कधी पकडता याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पान १ वरून...विकासपुरूष आमदार सुहास कांदे यांच्या स्वखर्चातून नांदगांव तालुक्यातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य सुविधांचा शुभारंभ

तात्काळ औषधे ही देण्यात येत आहेत. सदर सुविधा संपूर्ण मतदारसंघात नियोजन करून उपलब्ध होणार आहेत, प्रत्येक गावात होणाऱ्या कॅम्प ची माहिती दोन दिवस आधी गावात गाडी फिरवून, हॅण्डविलद्वारे व सोशल मीडिया तून दिली जाणार आहे. प्रत्येक नागरिकाने या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुहास आण्णा कांदे यांनी केले आहे तर तालुक्यातील नागरिकांसाठी व शेतकरी बांधवांसाठी मोफत दोन जेसीबी सुविधा या आधीच आ.कांदे यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत.

# पान १ वरून...गॅस सिलिंडर दरवाढ विरोधात शिवसेना ठाकरे गटातर्फे केंद्र व राज्य सरकार विरोधात आंदोलन

सर्वसामान्यांचे जगणे कठीण होत आहे. महागाईने जनता होरपळून निघत असताना केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत ५० रूपयांनी तर व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये ३५० रूपयांची वाढ झाली आहे. वाढत्या महागाईने सामान्य नागरिक बेजार झालेला आहे. मात्र, केंद्र सरकार महागाई कमी करण्याऐवजी नेहमी नवे दर जाहीर करून सर्वसामान्यांना धक्का देत आहे. कोरोना नंतर लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थव्यवस्था कोलमडली आहे. यातच गॅसचे दर वाढले आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख गणेश धात्रक, माजी आमदार राजेंद्र देशमुख, सहसंपर्कप्रमुख प्रवीण नाईक, जिल्हा उपप्रमुख संतोष बळीद, जिल्हा समन्वयक सुनील पाटील, जिल्हा संघटक संजय कटारिया, तालुका संघटक संतोष जगताप, शहरप्रमुख माधव शेलार, आशिष घुगे, सनी फसाटे, लियाकत शेख, रेणुका जयस्वाल, लीलाबाई राऊत, मुक्ता नलावडे, कैलास भाबड, विनय आहेर, प्रमोद पाचोरकर, खालीद शेख, विजय मिश्रा, जावेद मन्सुरी, अनिल दराडे, कैलास गवळी, दिनेश केकान, चंद्रकांत परब, प्रकाश बोधक, अशोक सानप, लक्ष्मण गोसावी, परेश राऊत, अंकुश गवळी आदी पदाधिकारी कार्यकर्त्या उपस्थित होते.


आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

BIS 100% Hall Marked Jewellery

**कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.**

* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
* 22 K 916 हॉलमार्कच्या दागिन्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
* फक्त 916 22 K मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
* हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
* हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
* भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
* 916 22 K हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
* हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
* २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
* नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
* साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. GST चे पक्के बिल मागून घ्या.
* दागिने खरेदी खरेदी केल्यावर GST चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
* तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
* जुने दागिने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
* रोजचे सोने-चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.



कंचन ज्वेलर्स

४५७, सराफ बाजार, मनमाड

दिपक गोयल

सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड

सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर

मो.9960931414


हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, तुषार प्रकाश गोयल यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव येथे छापून पूनम पब्लिसिटी गोयल बिल्डींग, मनमाड ४२३ १०४, जिल्हा नाशिक येथे प्रसिध्द केले. मो.९४२१५०५१२२ (मनमाडच्या न्यायकक्षेत) **संपादक : तुषार प्रकाश गोयल**

# मनमाड शहरात जागतिक 'महिला दिन' उत्साहात



मनमाड : (योगेश म्हस्के) दरवर्षी ८ मार्च रोजी संपूर्ण जगभरात जागतिक महिला दिन साजरा केला जातो , आपल्या समाजात असलेल्या सर्व स्त्रियांविषयी आपल्या मनात असलेला आदरभाव, सम्मान व्यक्त करण्यासाठी दरवर्षी हा दिवस संपुर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

सर्व महिलांना आपल्या अधिकाराची जाणीव तसेच आठवण व्हावी आपले महत्त्व कळावे म्हणून दरवर्षी आंतरराष्ट्रीय तसेच जागतिक महिला दिन साजरा करण्यात येत असतो, पहिला महिला दिवस हा न्युयॉर्क या देशात २८ फेब्रुवारी १९०९ रोजी साजरा करण्यात आला होता पण १९१० मधील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत मांडण्यात आलेल्या सूचनांनुसार दरवर्षी जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी साजरा केला जाईल असे निश्चित करण्यात आले होते.

मनमाड शहरात देखील अनेक संस्था आणि संघटनाच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला, मनमाड पोलीस स्टेशनमध्ये देखील आजच्या दिनानिमित्ताने पोलिस स्टेशनमधील महिला पोलिसांना महत्वाची जबाबदारी देण्यात आली होती, या प्रसंगी मनमाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या वतीने सर्व महिला अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

नांदगाव-मनमाड मराठी पत्रकार संघाच्या वतीने देखील महिला पत्रकार सदस्यांचा महिला दिनानिमित्ताने सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या वतीने वैद्यकीय आणि पोलीस सेवेतील महिला कर्मचारी यांचा महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष श्रीमती.नंदा गायकवाड, उपाध्यक्ष सौ.पद्मावती जाधव, सहखजिनदार सौ.भारती देवरे, प्रसिद्धी प्रमुख सौ.गीता गवळी, सचिव सौ.लता मोकळ, संघटक सौ.वैशाली वानखेडे आदी सदस्य उपस्थित होते. डायमंड सामाजिक संस्था आणि डायमंड ग्रुपच्या वतीने महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध स्पर्धे चे आयोजन करून शहरातील अनेक मान्यवर आणि महिलांचा सन्मान करण्यात आला.

## फुले शाहू आंबेडकर मुस्लिम विचारमंच तर्फे सावित्रीबाई फुले यांना स्मृति दिनानिमित्त अभिवादन



मनमाड : फुले शाहू आंबेडकर मुस्लिम विचार मंचच्या वतीने विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मनमाड शहर पोलीस ठाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते व नाईक हायस्कुलचे शिक्षक सुधीर पाटील यांच्या हस्ते सावित्राबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. या वेळी मंच चे अध्यक्ष बेग साहब, राजाभाऊ आहिरे, न.पा. चे दीपक पांडे, शरद घुसळे, पप्पू भाई, धर्मेंद्र भाई, इस्माईल पठाण, राजू शाह, राजाभाऊ लुनावत, अब्बास भाई, राजू खालसे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरोज शेख यांनी केले.

## के.आर.टी.शाळेत आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा



मनमाड : येथील कवी रवींद्रनाथ टागोर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे विश्वस्त धनंजय निंभोरकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य मुकेश मिसर.उपप्राचार्य वैभव कुलकर्णी. मुख्याध्यापक दीपक व्यवहारे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता पहिली व इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केलेले होते. इयत्ता पहिलीच्या कुश पाटील. उत्कर्षा ठाकरे, आरव जोशी, सायुरी केदारे यांनी आपल्या भाषणात वार नाही तलवार आहे ती समशेरीची धार आहे स्त्री म्हणजे अबला नाही ती तर धगधगता अंगार आहेत अशा शब्दात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी महिला दिनाचे औचित्य साधून वेशभूषा धारण केली. स्वरा गंगेले तिने नर्सची वेशभूषा साकारली. ब्लेसी राठोड ने मदर तेरेसा ची वेशभूषा साकारली. तानिया सुखडिया ने सानिया नेहवाल ची वेशभूषा साकारली. शरयू नागरे कार्तिकी सांगळे यांनी राणी लक्ष्मीबाईची वेशभूषा साकारली दर्शनी साळवे हिने सावित्रीबाईची वेशभूषा साकारली श्रेशा घटकर हिने शिक्षिकेची वेशभूषा साकारली. इयत्ता सहावीच्या गौरी सोनवणे एक सुंदर गीत गायले, जन्म बाईचा बाईचा खूप घाईचा एक आईचा आईचा एक ताईचा त्यानंतर समीक्षा आव्हाड हिने ज्याला स्त्री आई म्हणून कळली. तो जिजाऊचा शिवबा झाला आणि ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला, ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली तो राधेचा श्याम झाला आणि ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली तो सीतेचा राम झाला, अशा शब्दात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर रूद्राणी देशमानकर हिने आपले विचार प्रकट केले. या विद्यार्थ्यांना सौ.तेजस्विनी चांदेकर व कुमारी अमिता झाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन देवश्री शर्मा हिने केले.

## सेंट झेवियर हायस्कूलमध्ये महिला दिन साजरा



मनमाड : येथील सेंट झेवियर हायस्कूल मध्ये महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा सिस्टर रेखा तसेच शाळेचे मुख्याध्यापक मॅल्कम नातो, पर्यवेक्षिका सिस्टर ज्योत्स्ना व सर्व शिक्षिका उपस्थित होत्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमात मुख्याध्यापकांनी उपस्थित सर्व स्त्री शिक्षिकेंचा गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सिस्टर रेखा यांनी महिलांच्या समाजातील योगदानाबद्दल माहिती दिली. तर मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणातून उपस्थित महिला शिक्षिकांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी भाविका शिरसाठ हिने केले तर आभार प्रदर्शन कुमारी यशस्वी वैद्य हिने केले. सौ .लीना जाधव, सौ.रचना अहिरे, सौ.एलिझाबेथ शेल्टे व सौ.सरिता निकम यांनी महिला सन्मानार्थ एक गीत सादर केले. या गितास सौ.अंजलीना झेवियर, अशोक गायकवाड सर यांनी संगीताची साथ दिली. कु.पल्लवी झाल्टे हिने समाजातील कर्तृत्ववान स्त्रियांचा आपल्या भाषणात आढावा घेतला. कु. आर्या उबाळे, कु.धनश्री झाल्टे, कु. अनुष्का शंखपाळ, कु.जागृती आहिरे व कु. समृद्धी झाल्टे या मुलींनी थोर महिलांच्या वेशभूषेत येऊन त्यांचे विचार उपस्थितांना ऐकवलेत.

## छत्रे विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा




मनमाड : येथील छत्रे विद्यालयात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सौ.श्रद्धा धारवाडकर उपस्थित होत्या.या प्रसंगी संचालक प्रसाद पंचवाघ, मुख्याध्यापक रमेश थोरात यांनी आपल्या देशातील कर्तृत्ववान महिलांचा व त्यांच्या विविध क्षेत्रातील गौरवास्पद कार्याचा उहापोह केला

उपमुख्याध्यापक संदीप देशपांडे पर्यवेक्षक प्रविण व्यवहारे यांनी सामाजिक,राजकीय,कला क्षेत्रा बरोबरच क्रिडा क्षेत्रातही महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत असे प्रतिपादन केले.सौ एस.यू. देशपांडे यांनी महिला दिनाचे औचित्य साधून स्वतः तयार केलेली कविता सादर केली. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शाळेतील महिला शिक्षिका,कर्मचारी यांचा फेटा बांधून सत्कार करत भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.संस्थेचे आधारस्तंभ पीजी धारवाडकर,अध्यक्ष पी जे दिंडोरकर सचिव दिनेश धारवडकर,संचालक नाना कुलकर्णी,प्रसाद पंचवाघ,मुख्याध्यापक थोरात आर.एन., उपमुख्याध्यापक संदीप देशपांडे, वरिष्ठ पर्यवेक्षक प्रवीण व्यवहारे,पर्यवेक्षिका संगीता पोतदार या सर्वांनी शाळेतील सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे संयोजन निलेश जाधव व संतोष कोकणे यांनी केले.

## केंद्रीय इंजिनिअरिंग कारखान्यात शिवजयंती उत्साहात साजरी



मनमाड : मध्य रेल्वेच्या केंद्रीय कारखाना येथे सालाबादाप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कर्मचारी बाळनाथ म्हैसे, अनिल विल्सन गायकवाड, मधुकर सोनवणे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व युनियन प्रतिनिधीद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रम प्रसंगी कारखाना परिवारातील सर्व पुरुष व महिला कर्मचारी, अधिकारी वर्ग तसेच सर्व युनियन प्रतिनिधी उपस्थित होते.

# मनमाड महाविद्यालयात महिला दिनानिमित्त कबड्डी व ८०० मीटर धावणे स्पर्धा संपन्न



मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा व ८०० मीटर धावणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

८०० मीटर धावणे या स्पर्धेत महाविद्यालयातील शितल देवगुंडे वैशाली थोरात, रूपाली हरपडे या तीन विद्यार्थिनींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.जी.एल. शेंडगे यांनी आपल्या मनोगतातून बोलताना सांगितले की खेळांविषयी जाणीव जागृती निर्माण होणे गरजेचे आहेत. खेळ हे व्यक्तिमत्व विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात असे मत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी. कोऑर्डिनेटर डॉ.मिलिंद आहिरे, कार्यालयीन कुलसचिव समाधान केदारे सर, क्रीडा संचालक प्रा.सुहास वराडे, प्रा.श्रीमती कविता काकंडकी, प्रा. वर्षाराणी पेढेकर, एनसीसी विभागप्रमुख प्रा.बर्डे, प्रा.देविदास सोनवणे, प्रा.संदीप ढमाले व विद्यार्थी उपस्थित होते.

# आमदार सुहास कांदे संपर्क कार्यालयात महिला दिन साजरा लाभार्थी महिलांना सुकन्या योजनेचे पासबुक, शिधा पत्रिका वाटप

मनमाड : मनमाड शहर शिवसेना संपर्क कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महिलांना सुकन्या योजनेचे पासबुक तसेच शिधा पत्रिकेचे वाटप करण्यात आले.

महिला दिनाचे औचित्य साधत सौ.अंजुमताई कांदे यांच्या उपस्थितीत लाभार्थी महिलांना सुकन्या योजनेचे पासबुक तसेच शिधा पत्रिकेचे वाटप करण्यात आले. सौ.अंजुमताई कांदे यांनी महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आमदार सुहास अण्णा कांदे यांच्या माध्यमातून मतदार संघातील नागरिकांसाठी दोन फिरते दवाखाने व दोन सेतू कार्यालय उपलब्ध करून देण्यात आले असून याचा लाभ प्रत्येक महिलेने घ्यायचा असल्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले, लवकरच महिलांसाठी गृह उद्योग, लघु उद्योगाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने काम सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी महिलांना दिली. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडीच्या श्रद्धाताई कुलकर्णी, कल्पनाताई दोंदे, विद्याताई जगताप, संगीताताई बागुल, पूजाताई छाजेड, रोहिणीताई मोरे, सरलताई घोगळ, सुरेखा ढाके,नाजमा मिर्झा, नीता लोंढे, नीतू परदेशी, प्रतिभा अहिरे, संगीताताई सांगळे, लक्ष्मीताई अहिरे, अलकाताई कुमावत तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# मनमाड महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन



मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.व्ही.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.जी.एल.शेंडगे यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यांनी आपल्या मनोगतात सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक शैक्षणिक या क्षेत्रामध्ये असलेल्या योगदानाचा आढावा घेतला प्रचलित समाज व्यवस्थेने स्त्रियांचे स्वातंत्र्य, अधिकार यांच्यावर आणलेली बंधने व त्या विरोधात सावित्रीबाईंनी केलेले कार्य व हे खरोखरच क्रांतिकारक आहे या शब्दात त्यांनी आपले मत मांडले. सदर कार्यक्रमाप्रसंगी आय. क्यू.ए.सी.समन्वयक प्राध्यापक डॉ. मिलिंद अहिरे, कार्यालयीन कुलसचिव श्री समाधान केदारे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक संदीप ढमाले यांनी केले.

# के.आर.टी.विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी

मनमाड : येथील कवी रवींद्रनाथ टागोर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य मुकेश मिसर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यावेळेस मुख्याध्यापक दीपक व्यवहारे. जनरल सेक्रेटरी वैभव कुलकर्णी. विश्वास धनंजय निंभोरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केले. इयत्ता सहावीच्या तृषांत गायकवाड, समीक्षा पगारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्त्रियांच्या अंधाऱ्या जीवनात पेटविल्या ज्ञानाच्या ज्योती, म्हणून तर आज जगती. अमर आहे सावित्री अमर आहे सावित्री, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका तसेच मुख्याध्यापिका होत्या. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. विवाहानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना लिहायला. वाचायला. शिकवले व स्त्री शिक्षणाचा पाया रचला, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी १ जानेवारी १८४८ मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेत मुलींची पहिला शाळा काढली. सावित्रीबाईंनी बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, अशा वाईट प्रथांना विरोध केला. त्यांनी काव्यफुले बावनकशी सुबोध रत्नाकर असे काव्यसंग्रह लिहून समाज जागृती केली अखेर १० मार्च १८९७ रोजी या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी अखेरचा श्वास घेतला. अशा या तेजस्वी ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाईंना माझे कोटी कोटी प्रणाम या विद्यार्थ्यांना अमिता झाडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन समर्थ इप्पर यांनी केले.



# मनमाड महाविद्यालयात लिंगभाव समानता, वित्तीय सक्षमीकरण व तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड येथे महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लिंगभाव समानता, वित्तीय सक्षमीकरण व तंत्रज्ञान या विषयावर प्राचार्य डॉ.ए.व्ही.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



तज्ञ मार्गदर्शक श्रीमती अशुमती लोहारकर, ठाणे येथील वुई ऑल इंडिया असोसिएशन क्लबच्या संचालिका, यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी ऑनलाइन क्लासेस, कोर्सेस, मार्केटिंग वर्चुअल क्लास रूम, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व डिजिटल क्षेत्रातील क्रांती व त्याचबरोबर महिलांचा यामध्ये असणारा सहभाग याविषयी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले. विद्यार्थिनींनी बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपले करिअर निश्चित करावे यासाठी आवाहन केले. तज्ञ मार्गदर्शक श्रीमती संगीता माळी, भारतीय आयुर्विमा मंडळ मनमाड शाखेच्या असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटर ऑफिसर यांनी विद्यार्थिनींनी आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे व भविष्यकाळासाठी योग्य ती गुंतवणूक कशी करावी व गुंतवणुकीचे फायदे कसे असतात याविषयीची उत्कृष्ट माहिती कोविड काळाचा संदर्भ देऊन स्पष्ट केले. श्रीमती पवार, भारतीय आयुर्विमा मंडळ मनमाड शाखेच्या अधिकारी यांनी विद्यार्थिनींना शिकत असताना आर्थिक दृष्ट्या कसे सक्षम होता येईल याविषयीची माहिती दिली. त्याचबरोबर एलआयसी मध्ये सुद्धा स्त्रिया व विद्यार्थिनी कसे काम करू शकतात व स्वतःच्या पायावर कसे उभे राहू शकतात याविषयीची उदाहरणे देऊन वित्तीय सक्षमता कशी असते याविषयीची माहिती विशद केली.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.ए.व्ही.पाटील यांनी स्त्रियांविषयी गौरव उद्‌गार काढून म्हंटले की, स्त्री ही कुटुंबाचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी सतत प्रयत्नशील असते व आर्थिक घडी व्यवस्थित राहावी म्हणून सदैव झटत असते. स्त्रियांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज आहे व त्याचबरोबर नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थिनींनी आपले करिअर निश्चित करावे असे आवाहन केले. या कार्यशाळेचे संयोजन महिला कल्याण व तक्रार विभागाच्या अध्यक्षा प्रा. सौ. कविता काकंडकी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीमती वर्षाराणी पेढेकर यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती डॉ.आरती छाजेड यांनी केले. कार्यक्रम संपन्न होण्याकरीता हिंदी विभाग प्रमुख डॉ. जे.वाय. इंगळे, डॉ. गणेश गांगुर्डे, डॉ.मिलिंद अहिरे, प्रा.डि.वी. सोनवणे यांनी मोलाचे सहकार्य केले. वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जी.एल.शेंडगे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य श्रीमती पालवे, महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या सर्व सदस्या, विद्यार्थिनी, प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



मनमाड : सहा.पोलीस निरीक्षक पी.बी.गिते यांची नाशिक येथे बदली झाली. त्यानिमित्त त्यांचा निरोप समारंभ प्रसंगी त्यांचा सत्कार करतांना नांदगांव मनमाड मराठी पत्रकार संघाचे सदस्य छायाचित्ति दिसत आहेत.

## पाहिजेत

साप्ता.मनमाड ठिणगी तसेच ठिणगी न्यूज पोर्टल माध्यमांचे प्रतिनिधी तसेच जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहेत.
वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
**दिपक गोयल** (जाहिरात व्यवस्थापक)
सराफ बाजार, मनमाड मो.९९६०९३१४१४